

मराठा सेवा संघ प्रणीत

# अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर




रजि.नं.एएनआर/आरएसआर/सीआर/२८९७/२००० दि. २५/१०/२०००

**अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर**

मराठा सांस्कृतिक भवन, जिजाऊ मार्ग, बारातोटी कारंजा, अहमदनगर. फोन : (०२४१) २३५४९०७


जा. क्र. अ.जि.म.से.ना.सह. पतसंस्था/ अधिमंडळाची बैठक /५१/२०२२ दि. १०/०९/२०२२

## अधिमंडळाची बैठकीची नोटीस (फक्त सभासदांकरिता)

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २२ वी अधिमंडळाची बैठक रविवार, दि. २५ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी २:०० वाजता **शेतकरी निवास सभागृह, किसान क्रांती बिल्डिंग, मार्केट यार्ड, अहमदनगर येथे संस्थापक अध्यक्ष, चेअरमन शिवश्री इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांच्या कामकाजाकरिता आयोजित केली आहे. कृपया सर्व सभासदांनी बैठकीस उपस्थित राहावे ही विनंती.

**बैठकीपुढील विषय :-**

१. दि. २५/०९/२०२१ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ११/०६/२०२२ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३. वैधानिक लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. वैधानिक लेखापरीक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
५. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
६. पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाची आणि गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.
७. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
८. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
९. सन २०२०-२०२१ मधील वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
१०. राजर्षी शाहू महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., कर्जत ही संस्था आपल्या संस्थेमध्ये एकत्रीकरण करून घेणेबाबत विचारविनिमय करणे.
११. मा. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
(अशोक बापुराव वारकड)
मुख्य कार्यकारी अधिकारी
अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी
सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

**स्थळ : अहमदनगर**
दिनांक : १०/०९/२०२२

**टीप :**

१) कोरमअभावी बैठक तहकूब झाल्यास, त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून बैठकीचे कामकाज सुरु करण्यात येईल. तहकूब झालेल्या बैठकीस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना अधिमंडळाच्या बैठकीपुढील विषयासंबंधी माहिती पाहिजे असल्यासर, तसेच काही प्रश्न अगर सूचना द्यावयाच्या असल्यास दि. २०/०९/२०२२ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात.
३) सभासदांना व्हिडीओ कॉन्फरन्स झुमॲपद्वारे बैठकीमध्ये सहभागी होता येईल.
४) सभासदांनी व्हिडीओ कॉन्फरन्स झुपॲप युजर आयडी व पासवर्डसाठी मुख्य शाखा मो.-९४२०८०२४८२, भिंगार शाखा मो.९९२२१८९४२२, संगमनेर शाखा मो.९५१८७५६८४०, नेवासा शाखा मो.९०२१०७००८०, पाथर्डी शाखा मो.८८३०२१२२२४, मार्केटयार्ड शाखा मो.८७९६५६७३१८,शेवगांव शाखा मो.९७३०७७३९३३ या व्हॉटसॲप नं. व marathapat@rediffmail.com या ई-मेलवर नोंदणी करावी.
४) झुमॲपची लिंक, युजर आयडी व पासवर्ड दिनांक २४/९/२०२२ रोजी सभासदांनी नोंदणी केलेल्या नंबरवर पाठविण्यात येईल.
५) गुणगौरव समारंभ बैठकीच्या ठिकाणी सकाळी ११:०० वा. आयोजित केला आहे.

# ⁕ गुणगौरव समारंभ ⁕

मराठा समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेले समाजबांधव व भगिनी,तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी व गुणवंतांचा मराठा सेवा संघ व मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था, अहमदनगर यांच्या वतीने मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव समारंभ **रविवार, दि. २५/०९/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता शेतकरी निवास सभागृह, किसान क्रांती बिल्डींग, मार्केटयार्ड, अहमदनगर येथे आयोजित केलेला आहे.** तरी सर्व समाजबांधवांनी या समारंभास उपस्थित राहावे.

या समारंभासाठी विविध क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळविलेले समाजबांधव, तसेच एस.एस.सी. परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त व एच.एस. सी. परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, प्रज्ञाशोध परीक्षा, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा, एम. पी. एस. सी., यू. पी. एस. सी., मेडिकल, इंजिनिअरिंग व विविध परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवलेले विद्यार्थी, विद्यार्थिनी त्याचप्रमाणे सर्व शाखांचे पदवी व पदव्युत्तर परीक्षा शेकडा ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, तसेच कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रांत जिल्हा, राष्ट्रीय व राज्य पातळीवर प्रावीण्य मिळविलेले विद्यार्थी व विद्यार्थिनींनी किंवा त्यांच्या पालकांनी अधिकृत प्रमाणपत्र व मार्कशिटच्या छायांकित प्रतीसह तसेच स्वतःचा पत्ता व **फोन नंबर सह दि.२०/०९/२०२२ पर्यंत मराठा पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात पाठवावी.**

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संस्थापक अध्यक्ष, चेअरमन

**इंजि.सुरेश इथापे**
जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, अ.नगर

# ⁕ सभासदांना नम्र आवाहन ⁕

- ⁕ सभासदांनी आपला पत्ता व वारस इत्यादींमध्ये बदल झाला असेल तर ताबडतोब संस्थेस कळवावे, म्हणजे संस्थेच्या दफ्तरी त्याप्रमाणे योग्य नोंदी करता येतील.
- ⁕ सर्व सभासदांनी संस्थेतील विविध ठेव योजनांचा लाभ घ्यावा व इतरांना ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावेत आणि संस्थेच्या प्रगतीस हातभार लावावा.
- ⁕ संस्थेच्या सर्व कर्जदार सभासदांनी कर्जफेड वेळेवर व मुदतीत करून संस्थेस सहकार्य करावे, तसेच आपण ज्या कर्जदारांना जामीन आहात, ते कर्जदार वेळेवर कर्जाचे हप्ते भरतात की नाही याकडे लक्ष ठेवावे.

⁕ **शेअर सर्टिफिकेट –** ज्या सभासदांनी शेअर्स सर्टिफिकेट नेलेले नाहीत त्यांनी शेअर्स सर्टिफिकेट पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयातून घेऊन जावेत.

⁕ **लाभांश वाटपाबाबत –** ज्या सभासदांनी पतसंस्थेमध्ये बचत खाते उघडले आहे, त्यांचा लाभांश सभासदांच्या बचत खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे. ज्या सभासदांनी बचत खाते उघडलेले नसेल, त्यांनी बचत खाते उघडावे, म्हणजे लाभांशाची रक्कम खात्यात वर्ग करणे शक्य होईल.

# शाखा सल्लागार मंडळ

## ❊ मुख्य शाखा - अहमदनगर

शिवश्री निवृत्ती माधवराव कोल्हे, शिवश्री किसनराव सखाराम पायमोडे, शिवश्री डॉ. शरद गोविंदराव दुबे, शिवश्री ज्ञानेश्वर तुकाराम गांगर्डे, शिवश्री द्वारकाधीश उत्तमराव राजेभोसले, शिवश्री बाळासाहेब दशरथ खुळे, शिवश्री सारंग पठारे.

## ❊ मार्केट यार्ड, अहमदनगर शाखा

शिवश्री सुरेश रामभाऊ करपे, शिवश्री राजेंद्र हरिभाऊ शेटे, शिवश्री चंद्रकांत रावजी कांडेकर, शिवश्री महादेव धर्मनाथ कराळे, शिवश्री बाबासाहेब खंडूजी शिंदे, शिवश्री धर्मेंद्र दशरथ गिते, शिवश्री अतुल बाबूराव लहारे, शिवश्री प्रशांत सुरेश नेटके, शिवश्री नंदकुमार आसाराम बोरुडे.

## ❊ पाथर्डी शाखा

शिवश्री बाळासाहेब दशरथ सोनाळे, शिवश्री बापुसाहेब बबनराव कल्हापुरे, शिवश्री सर्जेराव धोंडीराम काकडे, शिवश्री योगेश सोपानराव वाकचौरे, शिवश्री विजय शेषराव चितळे, शिवश्री ॲड. चंद्रकांत नामदेव सातपुते, शिवश्री पुरुषोत्तम राम कचरे, शिवश्री बाळकृष्ण आसाराम शेळके, शिवश्री संभाजी माणिकराव चितळे, शिवश्री सूर्यकांत दत्तू बोरुडे, शिवमती आशा बाळासाहेब वारकड, शिवमती शोभना पांडुरंग काकडे, शिवश्री नामदेव सदाशिव लबडे, शिवश्री रवींद्र नामदेवराव मरकड, शिवश्री डॉ. बाळकृष्ण देवराम मरकड.

## ❊ संगमनेर शाखा

शिवश्री चंद्रकांत शंकर नवले, शिवश्री डॉ. माणिक पंढरीनाथ शेवाळे, शिवश्री बाळासाहेब जनार्धन आमटे, शिवश्री गंगाधर गोपीनाथ गायकवाड, शिवश्री भास्कर दशरथ खताळ, शिवश्री विजय यशवंत उगले, शिवश्री गवराम विठोबा रहाणे, शिवश्री विलास तुळशीराम कासार, शिवश्री मोहन यादवराव कडलग, शिवश्री प्रकाश संपत रहाणे, शिवमती मथुराबाई बिभीषण भोसले, शिवमती संजना संदीप शेळके.

## ❊ भिंगार शाखा

शिवश्री अर्जुनराव रामभाऊ बेरड, शिवश्री कैलास गंगाधर मोहिते, शिवश्री दत्तात्रय श्रीपतराव क्षीरसागर, शिवश्री कानिफनाथ नामदेव कासार, शिवश्री संजय माधवराव सपकाळ, शिवश्री कोंडिराम दशरथ वाघस्कर, शिवश्री लक्ष्मण बाबुराव कापसे, शिवश्री संतोष बन्सी बोबडे, शिवश्री बाबासाहेब लक्ष्मण चव्हाण, शिवश्री राजेंद्र रामदास बेरड, शिवश्री गणेश भोजराज साठे, शिवश्री अनिल भागचंद तनपुरे, शिवश्री भरत किसन खांदवे, शिवश्री रमेश मोतीराम साके, शिवश्री दादासाहेब अंबर कुरूमकर, शिवश्री राजेंद्र भाऊसाहेब लांडगे, शिवश्री अंकुश अशोक शिंदे.

## ❊ नेवासा शाखा

शिवश्री मुरलीधर नामदेव कराळे, शिवश्री भाऊसाहेब चांगदेव हारदे, शिवश्री बबन कचरू पवार, शिवश्री परशुराम मोहिनीराज मते, शिवश्री गोरक्षनाथ भानुदास बर्गे, शिवश्री सोमनाथ बाबूराव गायकवाड, शिवश्री सुनील जगन्नाथ शिंदे, शिवश्री रावसाहेब सदाशिव घुमरे, शिवश्री दशरथ रंगनाथ मुंगसे, शिवश्री राजेश दत्तात्रय जगताप, शिवश्री रघुनाथ किसन आगळे, शिवश्री अशोक पांडुरंग कुटे, शिवश्री जयकिसन भाऊसाहेब वाघ, शिवश्री शरद बानाभाऊ सुकाळकर, शिवश्री अशोक मोहन साळुंके, शिवश्री पंढरीनाथ हनुमंत म्हस्के, शिवश्री बन्सीभाऊ आगळे, शिवश्री रावसाहेब गोरक्षनाथ चौधरी, ॲड. अनंत बाळकृष्ण दरंदले.

## ❊ कायदेशीर सल्लागार

ॲड. माणिकराव मोरे, ॲड. शेखर दरंदले, ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. विलास गरड, ॲड. भगवंत काळे, ॲड. संदीप खांदवे, ॲड. प्रदीप कर्डिले, ॲड. शिवाजी कराळे, ॲड. शिल्पा बेरड, ॲड. अनुराधा येवले, ॲड. कृष्णा झावरे, ॲड. अशोक गुंड पाटील, ॲड. नितीन काळे, ॲड. नितीन अडसुरे, ॲड. दादाभाऊ वर्पे, ॲड. प्रियंका औटी, ॲड. मधुकर भांगरे, ॲड. साहेबराव चौधरी, ॲड.विजय गवांदे,

**उच्च न्यायालय** - ॲड. शिवाजी शेळके, ॲड. नितीन गवारे,ॲड. अभिजीत मोरे, ॲड. दत्ता नागोडे.

**❊ गोल्ड व्हॅल्युअर** मुख्य व मार्केट यार्ड शाखा -प्रियांक बेल्हेकर, भिंगार शाखा- अशोक अंबिलवादे, नेवासा शाखा- विजय दहिवाळकर, पाथर्डी शाखा - अरविंद जोजारे, संगमनेर शाखा -महेश मयूर.

**❊ प्रॉपर्टी व्हॅल्युअर** इंजि. आबासाहेब कर्डिले, इंजि. डी. ई. भगत, इंजि. मनीष गुळवे, इंजि. बाळासाहेब भिसे.







## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| शिवश्री इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे B.E. (Civil), M.Sc. | संस्थापक अध्यक्ष, चेअरमन |
| शिवश्री सतीश शंकरराव इंगळे M.Com. | व्हा. चेअरमन |
| शिवश्री ज्ञानदेव दत्तात्रय पांडुळे B.A. | संचालक-शाखाध्यक्ष,मार्केट यार्ड शाखा |
| शिवश्री किशोर मोहनराव मरकड B.Com, B.C.J. | संचालक-शाखाध्यक्ष, पाथर्डी शाखा |
| शिवमती राजश्री रवींद्र शितोळे B.A.,L.L.B.(I) | संचालिका-शाखाध्यक्षा, नेवासा शाखा |
| शिवश्री काशिनाथ कुंडलिक डोंगरे M.Com., G.D.C. & A. L.L.B. | संचालक-शाखाध्यक्ष, संगमनेर शाखा |
| शिवमती निर्मला कैलास गिरवले S.S.C. | संचालिका-शाखाध्यक्षा, मुख्य शाखा |
| शिवमती शोभाताई बाबासाहेब जाधव M.A., MMR. | संचालिका |
| शिवश्री ज्ञानेश्वर भाऊसाहेब अनभुले B.Com, M.S.W. | संचालक- शाखाध्यक्ष, भिंगार शाखा |
| शिवश्री प्रा. पोपटराव मारुती काळे M.A., B.Ed., LL.B. | तज्ज्ञ संचालक |
| शिवश्री सी.ए. विश्वास अरविंद कारंजकर B.Com., C.A., C.S. | तज्ज्ञ संचालक |
| शिवश्री राजेंद्र नामदेव ढोणे B.A., D.C.M. (दि.२८/०३/२०२२ पर्यंत) | मानद सचिव |
| शिवश्री अशोक बापुराव वारकड B.A., B.Com., G.D.C.&A. | मुख्य कार्यकारी अधिकारी |

## कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| शिवश्री बबन बाबुराव सुपेकर<br>B.Com., G.D.C.&A. | सह.<br>व्यवस्थापक |
| शिवश्री अशोक रामनाथ अरगडे<br>B.Com., G.D.C.&A. | शाखाधिकारी<br>संगमनेर शाखा |
| शिवमती अनुपमा बापुसाहेब भापकर<br>B.A., D.C.M. | शाखाधिकारी<br>मार्केट यार्ड शाखा |
| शिवश्री प्रितेश रेवन्नाथ बोरुडे<br>B.A., D.C.M. | शाखाधिकारी<br>भिंगार शाखा |
| शिवश्री महेशकुमार आसाराम नलवडे<br>M.Sc., G.D.C.& A. | शाखाधिकारी<br>शेवगांव शाखा |
| शिवश्री संतोष रघुनाथ पारखे<br>M.A., M.Ed. | प्र. शाखाधिकारी<br>नेवासा शाखा |
| शिवश्री गणेश विष्णू खोर्दे<br>B.A. | प्र. शाखाधिकारी<br>पाथर्डी शाखा |
| शिवश्री गोरख रामदास काटे<br>M.A. | वसुली अधिकारी<br>मुख्य शाखा |
| शिवश्री रणजित हरिभाऊ रकटाटे<br>M.Com., G.D.C.&A. | लेखाधिकारी<br>मुख्य शाखा |
| शिवश्री किशोर बबन कराळे<br>M.Com., | कनिष्ठ लिपिक<br>भिंगार शाखा |

| | |
|---|---|
| शिवमती कविता राजेंद्र ढोणे<br>D.Ed., B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक<br>मुख्य शाखा |
| शिवमती प्रियंका रामदास शिंदे<br>M.Com. (Appeared) | कनिष्ठ लिपिक<br>भिंगार शाखा |
| शिवश्री सूर्यकांत मारुती कदू<br>B.Sc. | कनिष्ठ लिपिक<br>शेवगाव शाखा |
| शिवमती दीपमाला नीलेश पवार<br>M.Com. | कनिष्ठ लिपिक<br>मार्केट यार्ड शाखा |
| शिवश्री प्रभाकर बबनराव जेधे<br>B.A. B.Ed. | कनिष्ठ लिपिक<br>पाथर्डी शाखा |
| शिवश्री दिलीप संपत खर्डे<br>B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक<br>संगमनेर शाखा |
| शिवश्री नीलेश विष्णू जाधव<br>B.A., (Appeared) | सहाय्यक<br>नेवासा शाखा |
| शिवश्री शशिकांत गुलाब बोरुडे<br>S.S.C. | सहाय्यक<br>मुख्य शाखा |
| शिवश्री प्रशांत महादेव बोरुडे<br>S.S.C. | सहाय्यक<br>मार्केट यार्ड शाखा |







## ❊ शाखा ❊

❊ **भिंगार -** ब्राह्मण गल्ली, भिंगार, अहमदनगर.
फोन (०२४१) - २४४१०५१

❊ **संगमनेर -** विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स् , टेलिफोन ऑफिसजवळ,
नवीन अकोले रोड, सावतामाळी नगर,
फोन (०२४२५) - २२०७९१

❊ **पाथर्डी -** नगरपालिका गाळा नं. ३७, वीर सावरकर मैदान,
भाजी बाजारतळ, पाथर्डी.
फोन नं. (०२४२८) - २२३०३२

❊ **नेवासा -** ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोर,
नेवासा फाटा, नेवासा, अहमदनगर,
फोन (०२४२७)-२४४४५६

❊ **मार्केटयार्ड -** छत्रपती शिवाजी महाराज संकुल,
कोठी रोड, मार्केटयार्ड, अहमदनगर.
फोन नं. (०२४१) - २४५२५७३

❊ **शेवगाव -** मेहेत्रे कॉम्प्लेक्स, आंबेडकर चौक,
शेवगाव मो.९७३०७७३९३३

## संस्थेची वैशिष्ट्ये

❊ अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्र ❊ शहराचे मध्यवर्ती ठिकाणी मुख्य कार्यालय
❊ स्वभांडवलावर कर्ज वितरण ❊ प्रशिक्षित सेवक वर्ग
❊ विनम्र व तत्पर सेवा ❊ संपूर्ण संगणकीकृत व पारदर्शक कामकाज
❊ कार्यक्षम तज्ज्ञ संचालक मंडळ व ग्राहकाभिमुख योजनेतून गतिमान कामकाज
❊ चेक क्लेरिंग,डी. डी.,आर.टी.जी.एस.व एन.ई.एफ.टी.सुविधा उपलब्ध
❊ ठेवीवर सर्वाधिक व्याज.

**सामाजिक उपक्रम : ❊ महापुरुषांचे जयंती उत्सव ❊ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव ❊ सभासदांना वैद्यकीय मदत ❊ सामाजिक गौरव समारंभाचे आयोजन ❊ २००० पेक्षा जास्त युवकांना उद्योगधंद्यासाठी अर्थसाह्य**

**कार्यालयीन वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०**
**साप्ताहिक सुट्टी रविवार - २ रा व ४ था शनिवार बंद.**

**- कॅश व्यवहार वेळ -**
**सकाळी ११.00 ते दुपारी ३.३०**

# २२ वा वार्षिक अहवाल

## सन २०२१-२०२२

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

आदरपूर्वक जय जिजाऊ!

आपल्या 'मराठा पतसंस्थेच्या' बाविसाव्या अधिमंडळाच्या बैठकीमध्ये आपल्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत ! मागील तीन वर्षापासून कोरोनाने आपल्या सर्वांच्या दैनंदिन जीवनशैलीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. आपण सर्वांनी फिनिक्स पक्ष्याप्रमाणे आता परत एकदा सर्वच पातळीवर भरारी घेतली आहे. जनजीवन पूर्वपातळीवर येऊन प्रगतीचा गाडा वेगाने धावू लागला आहे. या सर्व मानवनिर्मित संकटांना सामोरे जाऊन आपल्या पतसंस्थेने आपली आब राखून घसरगुंडी होऊन न देता दखलपात्र प्रगती केली आहे. त्यांचे सर्व श्रेय मा. संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी शिवश्री अशोक वारकड व त्यांचे सर्व सहकारी तसेच संचालक मंडळावर विश्वास ठेवणारे आपण सर्व सभासद यांना जाते. त्यामुळे सर्व संचालक मंडळातर्फे आम्ही सर्व कर्मचारी वृंद व सन्माननीय सभासद, ठेवीदार वर्गाचे मोकळया मनाने अभिनंदन करतो व आभारही मानतो. आपल्या पतसंस्थेचा दिनांक १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल व हिशेबाची पत्रके मा.संचालक मंडळाचे वतीने आपल्या सर्वांसमोर सादर करताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

आपल्या पतसंस्थेची स्थापना दिनांक २५/१०/२००० रोजी अहमदनगर येथे झाली. महाराष्ट्र राज्याचे सहकार खात्याचे तत्कालीन राज्यमंत्री कै.ना.बाबासाहेब कुपेकर यांच्या हस्ते पतसंस्थेचे उद्घाटन झाले. त्यानंतर पतसंस्थेच्या संचालकांनी अविरत कष्ट घेऊन समाजाचे देणे लागतो, या निरपेक्ष भावनेने काम करीत योगदान दिले आहे. आतापर्यंत योगदान दिलेल्या या सर्व आजी- माजी संचालकांच्या प्रती आम्ही ऋण व्यक्त करतो. गेल्या २२ वर्षात पतसंस्थेने अनेक व्यक्तींना त्यांच्या पायावर उभे केले आहे. तरूणांना देशात व परदेशात शिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य देऊन पाठबळ दिले आहे. अनेकांना उद्योजक म्हणूनही समाजासमोर आणले. ज्यांना पत नाही, त्यांना अर्थसहाय्य करत समाजामध्ये पत मिळवून दिली आहे. हे सर्व मराठा सेवा संघाच्या परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून घडले आहे, याचा आम्हास सार्थ अभिमान वाटतो.

गेली काही वर्षे मराठा समाजासाठी आपले सर्वस्व अर्पण केलेल्या वयोवृध्द व्यक्तींचे कार्य समाजासमोर आणण्यासाठी मराठा पतसंस्था व मराठा सेवा संघ, यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना 'जीवनगौरव' हा मानाचा पुरस्कार देण्याचे कर्तव्य पतसंस्थेचे संचालक मंडळ निरपेक्ष भावनेने पार पाडत आहे.

आतापर्यंत मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष स्मृतिशेष माधवराव मुळे (आबा), सचिव व विश्वस्त शिवश्री जी.डी.खानदेशे व जिजाऊ ब्रिगेडच्या माजी जिल्हाध्यक्षा शिवमती शोभाताई जाधव, मराठा समाज सेवा मंडळाचे उपाध्यक्ष स्मृतिशेष डॉ.रावसाहेब अनभुले, स्मृतिशेष बबनराव मिस्कीन तसेच मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा.पोपटराव काळे, प्राचार्य खासेराव शितोळे, शिवश्री. प्रल्हादराव शितोळे, अंबिका महिला बँकेच्या संस्थापिका प्रा. मेधाताई काळे, विद्यमान उपाध्यक्षा प्रा.पुष्पाताई मरकड, रयत शिक्षण संस्था, सातारा मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व मा. आमदार दादाभाऊ कळमकर, शिवधर्म संसद सदस्या शिवमती मंदाताई निमसे यांना 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन तसेच

पीडित महिलांसाठी आपले तारूण्य अर्पण करणारे माऊली सेवा प्रतिष्ठानचे संचालक व समाजसेवक डॉ.राजेंद्र व डॉ.सुचेता धामणे या दांपत्यास 'कर्म तपस्वी' हा पुरस्कार देऊन त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

कोरोना महामारीने सर्व जगाला ' डिजिटल' क्षेत्राची ओळख करून दिली, 'झोपलेल्याला जागे करणे', जागे झालेल्याला चालायला शिकविणे, चालणाऱ्याला पळायला शिकवणे व पळणाऱ्यांना इतरांना घेऊन पळायला लावणे, हा प्रबोधनाचा वसा घेतलेल्या मराठा सेवा संघाला साथ देण्यासाठी आपल्या पतसंस्थेने ऑनलाईन व्याख्यानमाले अंतर्गत वेगवेगळया क्षेत्रांतील विचारवंतांची व्याख्याने आयोजित केलेली आहेत. त्यास सभासदांचा व नागरिकांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे, हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते. या उपक्रमाचे सारथ्य पतसंस्थेचे संस्थापक संचालक ज्येष्ठ पत्रकार किशोर मरकड अतिशय समर्थपणे करीत आहेत. तसेच दिनांक ३ जानेवारी ते १२ जानेवारी दरम्यान मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजि. सुरेश इथापे व जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा संपुर्णाताई सावंत यांच्या विशेष सहकार्याने जिजाऊ सावित्री दशकोत्सवाच्या निमित्तानेही महिलांसाठी ऑनलाईन व्याख्यानमाला पतसंस्थेने आयोजित केली होती.

सामाजिक उपक्रमांमध्ये गुणवंतांचे कौतुक सोहळे, लोकमत सखी मंच श्रावण सोहळा, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, शिवजयंती, शिवराज्याभिषेक सोहळा, शाहू महाराज जयंती, जिजाऊ जयंती इत्यादी कार्यक्रम विविध क्षेत्रातील अधिकारी व गुणवंत यांच्या समवेत  साजरे केले जाऊन पतसंस्थेमार्फत त्याबाबत जनजागृती करण्याचे काम केले जाते, याचा संचालक मंडळास सार्थ अभिमान वाटतो.

दि.३ मे २०२२ रोजी अक्षय तृतीयेच्या मुहुर्तावर अहमदनगर येथे माऊली सभागृहामध्ये अतिशय भव्य असा राज्यस्तरीय पातळीवरील 'कृतज्ञता सन्मान सोहळा' मा.ॲड.पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.  या सोहळ्यासाठी संपूर्ण राज्यातील मराठा सेवा संघाचे पदाधिकारी, समाजबांधव उपस्थित होते.

मराठा पतसंस्थेने आता खऱ्या अर्थाने 'कात' टाकली आहे. अल्पावधीमध्ये १०० कोटींचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या अधिमंडळाच्या बैठकीच्या निमित्ताने आपण या समाजकार्याच्या जगन्नाथाच्या रथास जसे जमेल तसे सहकार्य करून हातभार लावावा व समाजाप्रती ऋण मानून फकिरीवृत्तीने योगदान देणाऱ्या या मराठा पतसंस्थेच्या प्रगतीसाठी आर्थिक सहकार्य करावे, अशी नम्रपणे विनंती करतो. समाजातील सर्व स्तरांतील घटकांना प्राधान्याने कर्ज वितरण करताना संस्था जी तत्परता व आस्था दाखविते, तीच तत्परता व सकारात्मकता कर्जदारांना वेळेवर कर्जाची परतफेड करताना दाखविली तर संस्था कमीत कमी कालावधीमध्ये सहज उद्दिष्टपूर्ती साध्य करेल, अशी आम्हास खात्री आहे. संपूर्ण संचालक मंडळ व निष्ठेने काम करणारे अधिकारी व कर्मचारी सदैव शंकानिरसन करण्यास आपल्या सेवेसाठी उपलब्ध आहेत. आपल्या निरंतर विश्वासास कोणत्याही परिस्थितीत संचालक मंडळ व कर्मचारी वृंदाकडून तडा जाणार नाही,अशी ग्वाही आम्ही देत आहोत.

सर्व सभासद, ठेवीदार, सर्व शाखांचे सल्लागार मंडळ, तसेच हितचिंतकांचे संस्थेवरील प्रेम, निष्ठा व अतूट विश्वास या पुढेही अटळ राहून भविष्यात जिजाऊ कृपेने वृद्धिंगत होईल व आपली पतसंस्था राज्यात एक नावाजलेली संस्था म्हणून नावारूपास येईल, अशी अपेक्षा बाळगतो. संस्थेचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने मान्यतेसाठी आपणास सादर करीत आहोत. आपल्या उपस्थितीबद्दल आपणास पुन्हा मन:पूर्वक धन्यवाद !

### ※ सभासद

पतसंस्थेचे दि. ३१/०३/२०२२ अखेर ४८६३ भागधारक सभासद आहेत.

### ※ भागभांडवल

दि. ३१/०३/२०२१ अखेर वसूल भागभांडवल रु. ४४,७९,५००.०० एवढे होते. अहवाल सालात भागभांडवलामध्ये रु. ५,३६,८००.०० इतकी वाढ झालेली आहे. दि. ३१/०३/२०२२ अखेर पतसंस्थेचे भागभांडवल रु. ५०,१६,३००.०० आहे.

### ※ राखीव व इतर निधी

संस्थेकडे दि. ३१/०३/२०२१ अखेर रु. १,००,०४,७१७.१९ इतका राखीव व इतर निधी शिल्लक होता. अहवाल सालात गत वर्षाच्या नफा वाटणीतून व चालू सालात केलेल्या तरतुदीमुळे रु. १५,६२,४०५.८४ इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२२ अखेर राखीव इतर निधी रु. १,१५,६७,१२३.०३ झालेला आहे.

### ※ ठेवी

दि. ३१/०३/२०२१ रोजी पतसंस्थेकडे रु. १९,७२,७१,५०१.६२ एवढ्या एकूण ठेवी होत्या. अहवाल सालात त्यात रू. ६,३८,७६,१७६.०९ इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२२ अखेर एकूण ठेवी रु. २६,११,४७,६७७.७१ झालेल्या आहेत.

### ※ कर्ज वितरण

दि. ३१/०३/२०२१ अखेर रु. १५,७७,५१,१०५.९० एवढे कर्ज वितरण केलेले होते. अहवाल सालात त्यात रू. ४,०८ ,१७,५५९.०० इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२२ अखेर एकूण कर्ज वितरण रु. १९,८५,६८,६६४.९० झालेले आहे.

### ※ मालमत्ता

अहवाल वर्षअखेर डेडस्टॉक, फर्निचर, संगणक इत्यादी रु. ८,५९,३८३.०० व नेवासा शाखा जागा रु. २५,९८,५४०.०० अशी एकूण रू. ३४,५७,९२३.०० संस्थेची मालमत्ता आहे.

### ※ संचालक मंडळ व नातेवाईक कर्जे

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ७२ (२) अन्वये मा. संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांकडून दि. ३१/०३/२०२२ अखेर येणे कर्ज व थकबाकीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | अहवाल वर्षाअखेर येणे कर्ज रक्कम रुपये | थकित रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | संचालकांची कर्जे | – | – |
| २ | संचालकांचे नातेवाईक यांची कर्जे | ३,०२,०६०.०० | – |

## ※ अहवाल सालात झालेला नफा व नफा वाटणी :

पतसंस्थेला अहवाल सालात दि. ३१.०३.२०२२ अखेर रक्कम रुपये ५,७६,४०४.८१ निव्वळ नफा झालेला आहे. सभासदांना ७ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे. तसेच पुढीलप्रमाणे निव्वळ नफ्याची वाटणी करण्याची शिफारस मंडळाने केलेली आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी ही विनंती.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | राखीव निधी (एकुण नफा रक्कमेच्या २५ टक्के) | १,४४,१०१.०० |
| २) | लाभांश (दि.३१/३/२०२१ वसुल भागभांडवल रक्कम रु.४४७९५००.०० वर ७ टक्के) | ३,१३,५६५.०० |
| ३) | धर्मादाय निधी | ५,७६४.०० |
| ४) | सभासद कल्याण निधी | २८,८२०.०० |
| ५) | इमारत निधी | ८४,१५४.८१ |
| | एकूण | ५,७६,४०४.८१ |

## ※ शाखा कामकाज

**संस्थेच्या एकूण मुख्य कार्यालयासह सहा शाखा आहेत. शाखेच्या ठेवी व कर्ज वितरणाची माहिती खालीलप्रमाणे**

| अ.नं. | तपशील | ठेवी | कर्ज वितरण |
|---|---|---|---|
| १) | मुख्य कार्यालय | ९,१३,४८,६१३.४६ | ५,९१,१४,३५२.०० |
| २) | भिंगार | १,६४,६२,९२७.७८ | ३,१०,२५,७३९.०० |
| ३) | संगमनेर | ४,५३,०४,४६०.३० | ३,५४,५४,९९१.४० |
| ४) | पाथर्डी | १,३९,३९,३५०.९० | २,४०,७५,३३२.५० |
| ५) | नेवासा | ३,१७,०७,३५१.२४ | २,०९,५१,०११.०० |
| ६) | मार्केट यार्ड, अ.नगर | ६,२३,८४,९७४.०३ | २,७९,४७,२३१.०० |
| | एकूण | २६,११,४७,६७७.७१ | १९,८५,६८,६६४.९० |

## ※ ऋणनिर्देश :

आपल्या संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सर्व आजी माजी संचालकांचा तसेच सल्लागार व हितचिंतकांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाचा, सहकार्याचा आणि पाठिंब्याचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सातत्याने वृद्धिंगत होणाऱ्या ग्राहकांच्या विश्वासावर आणि सहकार्याबद्दल संस्थेने भरीव प्रगती व कामगिरी केलेली आहे. त्यापुढील काळात संस्थेच्या भरभराटीसाठी आतापर्यंत आपण दिलेल्या सहकार्याव्यतिरिक्त अधिक सक्रिय सहभागाची, मार्गदर्शन व विधायक सूचनांची आम्ही अपेक्षा करीत आहोत.

संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ॲड. पुरुषोत्तम खेडेकर साहेब, जिल्हा उपनिबंधक दिग्विजय आहेर साहेब, जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी साहेब व तालुका उपनिबंधक किशन रत्नाळे साहेब व त्यांचे सहकारी, चार्टर्ड अकौंटंट डी.के. काळे, गणेश कदम, पराग मुथ्था, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर जिल्हा नागरी पतसंस्थेचे फेडरेशन, अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेशन, उपनिबंधक सह.संस्था नगर तालुका यांचे कार्यालय, सर्व वर्तमानपत्रे व न्यूज चॅनेलचे संपादक, वार्ताहर व प्रतिनिधी, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, शंभुराजे युवा क्रांती यांनी अहवाल वर्षात दिलेल्या सक्रिय सहभागाबद्दल आपल्या सर्वांचे आम्ही व आमचे सर्व सहकारी आभार मानून मोकळे न होता सदैव आपल्या ऋणात राहून मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेचा सन २०२१-२२ चा अहवाल सर्वांना सादर करीत आहोत.

धन्यवाद ! जय जिजाऊ ! जय शिवराय !

**शिवश्री सतीश शंकरराव इंगळे**
व्हा. चेअरमन

**शिवश्री विजयकुमार गोविंदराव ठुबे**
संस्थापक अध्यक्ष, चेअरमन

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर.

## ताळेबंद पत्रक

| दि. ३१/०३/२०२१ | भांडवल व देणी | दि. ३१/०३/२०२२ | |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| **५०,००,०००.००** | **अधिकृत भागभांडवल** | | **५०,००,०००.००** |
| **४४,७९,५००.००** | **वसूल भागभांडवल** | **५०,१६,३००.००** | **५०,१६,३००.००** |
| **१,००,०४,७१७.१९** | **राखीव व इतर निधी** | | **१,१५,६७,१२३.०३** |
| ३९,९३,३१६.८० | राखीव | ४४,१३,८०६.८० | |
| १९,०२,७८२.३९ | इमारत | २०,८४,१२१.२३ | |
| २९,६५,०३९.०० | संशयित, बुडीत व एन.पी.ए. कर्ज | ३०,००,०००.०० | |
| १,९८,४७८.०० | थकित येणे व्याज | ८,००,०००.०० | |
| १,०९,२९२.०० | धर्मादाय निधी | १,१३,३८६.०० | |
| २,९४,७३८.०० | सभासद कल्याण | २,४४,७३८.०० | |
| ३,५४,८४६.०० | उत्तम कर्जावरील तरतूद | ६,२४,८४६.०० | |
| १,८६,२२५.०० | सांस्कृतिक कार्यक्रम | १,८६,२२५.०० | |
| ०.०० | ग्रॅच्युईटी | १,००,०००.०० | |
| **१९,७२,७१,५०१.६२** | **ठेवी** | | **२६,११,४७,६७७.७१** |
| ८,२४,५७,८१०.०० | मुदत | ११,०४,४३,६९६.०० | |
| १,१८,२६,८०५.६२ | बचत ठेव | २,६६,७८,५९७.७१ | |
| १,२०,०४,१३६.०० | दामदुप्पट | १,३५,२५,४२८.०० | |
| ३,४३,५००.०० | संचित | ४,२०,७००.०० | |
| १९,७६,४२६.०० | दैनंदिन | २४,२८,४९६.०० | |
| ८,५६,१७,१६०.०० | ज्येष्ठ नागरिक | १०,४३,६१,१६१.०० | |
| २८,०३६.०० | करंट खाते | २५,०७१.०० | |
| ११,९४,१२८.०० | कर्ज अनामत | १४,२६,०२८.०० | |
| ८,१३,५००.०० | जिजाऊ लखपती | ६,४५,५००.०० | |
| १०,१०,०००.०० | शंभूराजे चिरंजीव | ११,९३,०००.० | |
| **९३,५४,२७८.००** | **इतर देणी व तरतुदी** | | **१,०९,३१,८८३.००** |
| ५५,४१,१८९.०० | ठेवीवरील व्याज | ७०,५७,०३०.०० | |
| २,६६,९६२.०० | ऑडिट फी | १,५९,३०३.०० | |
| १२,२००.०० | निवडणूक निधी | १२,२००.०० | |
| ९,०४३.०० | बोनस | २,०९,०४३.०० | |
| २,५२,४३३.०० | वसुली खर्च | २,१२,०९६.०० | |
| ४,५०,१४८.०० | कायदा खर्च | ४,५०,१४८.०० | |
| २४,०३,९५५.०० | अनामत | २४,२३,७३६.०० | |
| ५३,७०४.०० | लाभांश सन १८ | ०.०० | |
| ५८,९०५.०० | लाभांश सन १९ | ५४,२२९.०० | |
| ३,०५,७३९.०० | लाभांश सन २० | ९२,०३६.०० | |
| ०.०० | लाभांश सन २१ | २,६२,०६२.०० | |
| **३,९३,४९,६४३.८८** | **शाखा देणे (दुबेरजी)** | **५,३५,४८,३४३.९५** | **५,३५,४८,३४३.९५** |
| **४,०९,४२७.८४** | **निव्वळ नफा** (दि. ३१/०३/२२) | **५,७६,४०४.८१** | **५,७६,४०४.८१** |
| **२६,०८,६९,०६८.५३** | **एकूण** | **३४,२७,८७,७३२.५०** | **३४,२७,८७,७३२.५०** |





## दि. ३१/०३/२०२२ अखेर

| दि. ३१/०३/२०२१ | जिंदगी व येणी | दि. ३१/०३/२०२२ | |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| **१०,५५,२४८.००** | **रोख शिल्लक** | **१५,३१,६२२.००** | **१५,३१,६२२.००** |
| **९,४१,९६५.७५** | **बँकेतील शिल्लक** | **२,५३,८०,५६१.६५** | **२,५३,८०,५६१.६५** |
| **४,९४,८५,३२८.००** | **गुंतवणूक** | **५,०८,२३,२४१.००** | **५,०८,२३,२४१.००** |
| **६२,४९६.००** | **डिपॉझिट** (कृषी उत्पन्न बाजार समिती) | **६२,४९६.००** | **६२,४९६.००** |
| **१५,७७,५१,१०५.९०** | **कर्ज व उचल** | | **१९,८५,६८,६६४.९०** |
| १,०६,२१,४१८.०० | वैयक्तिक | १,२३,८२,३६६.०० | |
| २८,६२,९६०.०० | व्यावसायिक | ३१,६१,८०४.०० | |
| १,६०,४४,९९६.४० | ठेव तारण | २,२५,९६,०३६.४० | |
| २२,८०,५९५.०० | वाहन तारण | ३०,४८,५९२.०० | |
| १०,५४,०१०.०० | दैनंदिन | ११,३५,४१२.०० | |
| ६,०५,७६४.०० | सुलभ | ५,७९,३२०.०० | |
| ४,४८,२०,०३५.०० | सोने तारण | ५,४३,८५,११०.०० | |
| २,९२,६१०.०० | सोने तारण कॅश क्रेडिट | २,७९,३४३.०० | |
| २,६९,८३,५६६.५० | कॅश क्रेडिट | ३,७४,६०,०६३.५० | |
| ५,२१,८५,८७१.०० | स्थावर तारण | ६,३५,४०,५७८.०० | |
| **३२,७०,०३९.००** | **मालमत्ता** | | **३४,५७,९२३.००** |
| ६,७१,४९९.०० | फर्निचर डेडस्टॉक | ८,५९,३८३.०० | |
| २५,९८,५४०.०० | नेवासा शाखा जागा | २५,९८,५४०.०० | |
| **८९,५३,२४२.००** | **इतर जिंदगी** | | **९४,१४,८८०.००** |
| ३४,३६,६६६.०० | बँक गुंतवणूक व्याज | २५,०९,९६३.०० | |
| ५३,०१,९७२.०० | कर्ज व्याज येणे | ६३,४६,३२३.०० | |
| ४६,४८५.०० | ए. टी. एम. कार्ड | ४६,४८५.०० | |
| ३५,०००.०० | ॲडव्हान्स | ३५,०००.०० | |
| १,३३,११९.०० | टी.डी.एस. | ४,७७,१०९.०० | |
| **३,१३,४९,६४३.८८** | **शाखा येणे (दुबेरजी)** | **५,३५,४८,३४३.९५** | **५,३५,४८,३४३.९५** |
| **२६,०८,६९,०६८.५३** | **एकूण** | **३४,२७,८७,७३२.५०** | **३४,२७,८७,७३२.५०** |

## नफा-तोटा पत्रक

| दि. ३१/०३/२०२१ | खर्च | दि. ३१/०३/२०२२ | |
|---|---|---|---|
| | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| **१,९२,१४,७९६.००** | **ठेवीवरील व्याज** | **२,१०,४४,५५२.००** | **२,१०,४४,५५२.००** |
| **४,८०,३१४.००** | **कर्जावरील व्याज** | | **१५,१४,८०३.००** |
| ४,८०,३१४.०० | बँक ओडी व्याज | १५,१४,८०३.०० | |
| **४२,६७,८१४.६९** | **शाखा अंतर्गत व्याज** | **५५,०४,२१४.००** | **५५,०४,२१४.००** |
| ३०,००,९९९.०० | **कर्मचारी पगार व भत्ते** | | **३१,१६,६७८.००** |
| २३,२८,३७३.०० | कर्मचारी पगार | २४,३३,७७२.०० | |
| ३,२५,९६९.०० | कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी | २,८९,९९६.०० | |
| १,७३,२५०.०० | मानधन | ०.०० | |
| १,७२,६०७.०० | बोनस | ३,९२,९१०.०० | |
| **११,९४,६६२.४६** | **प्रशासकीय व व्यवस्थापकीय खर्च** | | **१७,६६,०७२.४९** |
| ३५,०९३.०० | छपाई व स्टेशनरी | ३८,७५१.०० | |
| ३५,१४१.०० | टेलिफोन | ३५,९३३.०० | |
| ३,७२५.०० | पोस्टेज | २६,९८०.०० | |
| ३३,२३०.०० | सभा समारंभ | १,५८,६०८.०० | |
| ४,१३,४५०.०० | इमारत भाडे | ४,२८,९४६.०० | |
| २५,२६४.०० | महानगरपालिका कर | २५,२६४.०० | |
| ०.०० | कोर्ट | ७०,०००.०० | |
| १,०३,५८१.०० | घसारा | १,७३,७१६.०० | |
| २,१३०.०० | इलेक्ट्रिकल्स व फर्निचर दुरुस्ती | ३१,८६५.०० | |
| ६८,९८५.०० | इतर | ४०,९२३.०० | |
| १८,७००.०० | प्रवास | ६१,४८५.०० | |
| ३९,६४७.०० | सादिलवार | ६१,१६६.०० | |
| ४८,७२९.०० | लाईट बिल | ४८,१८०.०० | |
| ५,१८०.०० | झेरॉक्स | २०,२३७.०० | |
| ७२,५०६.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल | ९५,९१३.०० | |
| ४९,५६७.०० | लॉकर भाडे | २५,५४२.०० | |
| २३,१४०.०० | आरटीओ ट्रेड सर्टिफिकेट नूतनीकरण | ०.०० | |
| ०.०० | व्यवसाय कर | १,५००.०० | |
| ६,०००.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा | १,३४,३६४.०० | |
| ३६,९४५.०० | विमा | ३७,६२१.०० | |
| ३,९४९.०० | वृत्तपत्रे व मासिक | ४,४८२.०० | |
| ०.०० | प्रशिक्षण | ४८,८५२.०० | |
| ३,९९४.४६ | बँक कमिशन | ७,४१२.४९ | |
| १,५९,७०६.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | १,५३,६०४.०० | |
| ०.०० | वार्षिक वर्गणी | ४,७२०.०० | |
| ०.०० | जाहिरात | ३०,०००.०० | |
| ६,०००.०० | प्रोफेशनल कन्सल्टंट फी | ०.०० | |
| **१०,००,०००.००** | **तरतुदी** | | **१५,१४,२८६.००** |
| ८,००,०००.०० | एन.पी.ए. | ४,५४,८६४.०० | |
| ०.०० | थकीत व्याज | ४,३९,४२२.०० | |
| ५०,०००.०० | उत्तम कर्ज व्याज | २,७०,०००.०० | |
| १,५०,०००.०० | ऑडिट फी | २,५०,०००.०० | |
| ०.०० | ग्रॅच्युईटी | १,००,०००.०० | |
| **४,०१,४२७.८४** | **निव्वळ नफा ताळेबंदाकडे वर्ग** | **५,७६,४०४.८१** | **५,७६,४०४.८१** |
| **२,९५,६७,२१३.९९** | **एकूण** | **३,५०,३७,०१०.३०** | **३,५०,३७,०१०.३०** |

दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२

| दि. ३१/०३/२०२१ रुपये पैसे | उत्पन्न | दि. ३१/०३/२०२२ रुपये पैसे | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **२,५२,३०,९४७.३०** | **मिळालेले व्याज** | | **२,९३,५६,२२१.३०** |
| २,१४,९५,८३५.०० | कर्जावरील व्याज | २,५९,४१,६४३.०० | |
| ५,५९,६५४.०० | कर्जावरील दंड व्याज | ९,५१,९६०.०० | |
| ३१,७५,४५८.३० | गुंतवणुकीवरील व्याज | २४,६२,६१८.३० | |
| **४२,६७,८१४.६९** | **शाखा अंतर्गत व्याज** | **५५,०४,२१४.००** | **५५,०४,२१४.००** |
| **६८,४५२.००** | **इतर जमा** | | **१,७६,५७५.००** |
| ०.०० | जिल्हा बँक लाभांश | ५,७९५.०० | |
| २२०.०० | नो ड्यूज | ०.०० | |
| ३२,३८२.०० | प्रोसेस फी | १,६०,८३०.०० | |
| ३५,८५०.०० | फॉर्म फी | ९,९५०.०० | |
| **२,९५,६७,२१३.९९** | **एकूण** | **३,५०,३७,०१०.३०** | **३,५०,३७,०१०.३०** |

## अंदाजपत्रकापेक्षा सन २०२१-२२ मधील कमी-जादा झालेला खर्च व सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक

| खर्च खाते तपशील | सन २०२१-२२ सालासाठी अंदाज रुपये पैसे | सन २०२१-२२ प्रत्यक्ष झालेला खर्च रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी रुपये पैसे | सन २०२२-२३ सालासाठी अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | २,४०,००,०००.०० | २१,०,४४,५५२.०० | - | २९,५५,४४८.०० | २,६५,००,०००.०० |
| बँक ओडी व्याज | ३,००,०००.०० | १५,१४,८०३.०० | १२,१४,८०३.०० | - | २,००,०००.०० |
| कर्जावरील रिबेट व्याज | १,००,०००.०० | - | - | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| सामोपचार परतफेड सवलत | ४,००,०००.०० | - | - | ४,००,०००.०० | ४,००,०००.०० |
| कर्मचारी पगार | २९,००,०००.०० | २४,३३,७७२.०० | - | ४,६६,२२८.०० | ३५,००,०००.०० |
| कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी | ४,००,०००.०० | २,८९,९९६.०० | - | १,१०,००४.०० | ४,००,०००.०० |
| ग्रॅच्युईटी | २,००,०००.०० | १,००,०००.०० | - | १,००,०००.०० | २,००,०००.०० |
| वार्षिक रजेचा पगार | १,००,०००.०० | - | - | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| बोनस | २,२०,०००.०० | ३,९२,९१०.०० | १,७२,९१०.०० | - | ४,००,०००.०० |
| प्रवास भत्ता | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | २०,०००.०० |
| छपाई व स्टेशनरी | ८०,०००.०० | ३८,७५१.०० | - | ४१,२४९.०० | ९०,०००.०० |
| टेलिफोन | ५०,०००.०० | ३५,९३३.०० | - | १४,०६७.०० | ६०,०००.०० |
| संचालक मंडळ भत्ते | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | २०,०००.०० |
| जाहिरात | ८०,०००.०० | ३०,०००.०० | - | ५०,०००.०० | १,५०,०००.०० |
| पोस्टेज | ६०,०००.०० | २६,९८०.०० | - | ३३,०२०.०० | ७०,०००.०० |
| सभा समारंभ | ८०,०००.०० | १,५८,६०८.०० | ७८,६०८.०० | - | २,००,०००.०० |
| गुणगौरव समारंभ | ६०,०००.०० | - | - | ६०,०००.०० | ९०,०००.०० |
| इमारत भाडे | ५,५०,०००.०० | ४,२८,९४६.०० | - | १,२१,०५४.०० | ६०,०,०००.०० |
| महानगरपालिका कर | ३०,०००.०० | २५,२६४.०० | - | ४७३६.०० | ३५,०००.०० |
| कोर्ट | ६०,०००.०० | ७०,०००.०० | १०,०००.०० | - | ९०,०००.०० |
| ऑडिट फी | २,००,०००.०० | २,५०,०००.०० | ५०,०००.०० | - | ३,००,०००.०० |
| घसारा | १,५०,०००.०० | १,७३,७१६.०० | २३,७१६.०० | - | २,००,०००.०० |
| इलेक्ट्रिकल्स व फर्निचर दुरूस्ती | ८०,०००.०० | ३१,८६५.०० | - | ४८,१३५.०० | ४०,०००.०० |
| इतर | ८०,०००.०० | ४०,९२३.०० | - | ३९,०७७.०० | ६०,०००.०० |
| प्रवास | ४०,०००.०० | ६१,४८५.०० | २१,४८५.०० | - | ८०,०००.०० |
| सादिलवार | ७०,०००.०० | ६१,१६६.०० | - | ८,८३४.०० | ७५,०००.०० |
| लाईट बिल | ७०,०००.०० | ४८,१८०.०० | - | २१,८२०.०० | ६०,०००.०० |
| झेरॉक्स | ३०,०००.०० | २०,२३७.०० | - | ९,७६३.०० | ४०,०००.०० |
| संगणक दुरूस्ती व देखभाल | ९५,०००.०० | ९५,९१३.०० | ९१३.०० | - | १०,०००.०० |
| इंधन | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | - |
| लॉकर भाडे | ७०,०००.०० | २५,५४२.०० | - | ४४,४५८.०० | ५०,०००.०० |
| आर. टी. ओ. ट्रेड सर्टिफिकेट | २५,०००.०० | ०.०० | - | २५,०००.०० | ४०,०००.०० |
| व्यवसाय कर | २०००.०० | १,५००.०० | - | ५००.०० | २,०००.०० |

## अंदाजपत्रकापेक्षा सन २०२१-२२ मधील कमी-जादा झालेला खर्च व सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक

| खर्च खाते तपशील | सन २०२१-२२ सालासाठी अंदाज रुपये पैसे | सन २०२१-२२ प्रत्यक्ष झालेला खर्च रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी रुपये पैसे | सन २०२२-२३ सालासाठी अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| वार्षिक सर्वसाधारण सभा | १,५०,०००.०० | १,३४,३६४.०० | - | १५,६३६.०० | २,००,०००.०० |
| विमा | ५०,०००.०० | ३७,६२९.०० | - | १२,३७१.०० | ५०,०००.०० |
| वृत्तपत्रे व मासिक | ५,०००.०० | ४,४८२.०० | - | ५१८.०० | ६,०००.०० |
| प्रशिक्षण | ६०,०००.०० | ४८,८५२.०० | - | ११,१४८.०० | ८०,०००.०० |
| बँक कमिशन | ५,०००.०० | ७,४१२.४९ | २,४१२.४९ | - | १०,०००.०० |
| दैनंदिन ठेव कमिशन | २,००,०००.०० | १,५३,६०४.०० | - | ४६,३९६.०० | ३,००,०००.०० |
| एन.पी.ए. तरतूद | ७,००,०००.०० | ४,५४,८६४.०० | - | २,४५,१३६.०० | १०,००,०००.०० |
| थकित व्याज तरतूद | २,००,०००.०० | ४,३९,४२२.०० | २,३९,४२२.०० | - | ५,००,०००.०० |
| उत्तम कर्जावरील तरतूद | १,००,०००.०० | २,७०,०००.०० | १,७०,०००.०० | - | २,००,०००.०० |
| निवडणूक खर्च तरतूद | २,००,०००.०० | - | - | २,००,०००.०० | ३,००,०००.०० |
| प्रोफेशनल व कन्सल्टंट फी | १०,०००.०० | - | - | १०,०००.०० | १९,०००.०० |
| वार्षिक वर्गणी | १०,०००.०० | ४,७२०.०० | - | ५,२८०.०० | ५,०००.०० |
| नफा | ५,१०,०००.०० | ५,७६,४०४.८१ | ६६,४०४.८१ | - | ७,००,०००.०० |
| एकूण | ३,२८,४२,०००.०० | २,९५,३२,७९६.३० | २०,५०,६७४.३० | ५३,५९,८७८.०० | ३,७५,५२,०००.०० |

| उत्पन्न खाते तपशील | सन २०२१-२२ सालासाठी अंदाज रुपये पैसे | सन २०२१-२२ प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी रुपये पैसे | सन २०२२-२३ सालासाठी अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | २,८०,००,०००.०० | २,५९,४१,६४३.०० | २०,५८,३५७.०० | - | ३,२२,००,०००.०० |
| कर्जावरील दंड व्याज | ६,९०,०००.०० | ९,५१,९६०.०० | - | २,६१,९६०.०० | १२,००,०००.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ४०,००,०००.०० | २४,६२,६१८.०० | १५,३७,३८२.०० | - | ४०,००,०००.०० |
| लाभांश | १२,०००.०० | ५,७९५.०० | ६,२०५.०० | - | १,२०००.०० |
| नोड्यूज | २,०००.०० | - | २,०००.०० | - | २,०००.०० |
| प्रोसेस फी | १,००,०००.०० | १,६०,८३०.०० | - | ६०,८३०.०० | १,००,०००.०० |
| फॉर्म फी | ३८,०००.०० | ९,९५०.०० | २८,०५०.०० | - | ३८,०००.०० |
| एकूण | ३,२८,४२,०००.०० | २,९५,३२,७९६.०० | ३६,३१,९९४.०० | ३,२२,७९०.०० | ३,७५,५२,०००.०० |

# वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ८१ (५-ब) आणि

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

प्रति,

अध्यक्ष साहेब,
अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अहमदनगर
चासतोटी कारंजा,माळीवाडा, जि. अहमदनगर

---

संदर्भ: वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २५/०९/२०२१, ठराव क्रमांक :- ०७

१) आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैधानिक लेखापरीक्षकाचा अभिप्राय :-

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या चासतोटी कारंजा,माळीवाडा, जि. अहमदनगर या संस्थेचे दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ या आर्थिक वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केलेले असून त्यामध्ये दि. ३१/०३/२०२२ या दिनांकाचा ताळेबंद, त्या दिनांकास संपणारे न हा तोटा पत्रक या सहकारी वर्षाचे नफातोटा पत्रक आणि त्यामध्ये समाविष्ट केलेल्या हिशोबाच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

२) आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 आणि त्या अंतर्गत बनविलेल्या नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करतांना अपहार किंवा चुक यामुळे होणा-या लक्षणीय चुकांपासून मुक्त राहतील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणे बाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे यांचा समावेश असेल.

३) लेखापरीक्षकाची जबाबदारी :-

अ) आर्थिक हिशोबपत्रके बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरीक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मानदंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरून केलेले आहे. ह्या मानदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची आखणी आणि अंमलबजावणी अशा प्रकारे करावी लागते की ज्या योगे ह्या हिशोबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण खात्री पटेल.

ब) लेखापरीक्षणामध्ये लेखापरीक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पध्दत आहे. व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रकामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे, संस्थेने तयार केलेल्या आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनीयोजनेच्या वापराची पध्दत

१

उचीत परिस्थितीत योग्य आहे. लेखापरीक्षणामध्ये जमा खर्चाचा अंदाज त्याच प्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती, पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

४) अभिप्राय

अ) आमच्या मते आणि आम्हास मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रीत केलेल्या टिपणी या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा कायदा, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थांसाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

१. ताळेबंदाचे बाबतीत दि. ३१/०३/२०२२ ची संस्थेची स्थिती आणि

२. नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची / तोट्याची सोबत जोडलेल्या लेखापरीक्षण भाग अ, ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

५) इतर कायदेशीर नियमावली संदर्भात अभिप्राय

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदीनुसार ताळेबंद व नफा आणि तोटा पत्रक तयार करण्यात आलेली आहेत.

६) मी अहवाल देतो की,

अ) लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत. व ते पुरेसे आहेत.

ब) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टीपत्तीस येईल, त्याप्रमाणे संस्थेने केलेले व्यवहार हे संस्थेच्या अधिकार मर्यादेच्या आतील आहेत.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून आलेली विवरणपत्रे योग्य व परिपूर्ण आहेत.

७) आमच्या मताप्रमाणे ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक याचे लेखांकन मानकाप्रमाणे आहे.

८) मी पुढे असा अहवाल देतो की,

१. या अहवालासंदर्भातील ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे हिशोबाची पुस्तके व विवरणपत्रकानुसार जुळतात.

२. आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टीपत्तीस येईल त्या नुसार संस्थेने कायद्यानुसार आवश्यक अशी योग्य ती हिशोब पुस्तके ठेवलेली आहेत.

३. संस्थेच्या शाखांचे हिशोबाची तपासणी करून आलेले लेखापरिक्षकांचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.

४. संस्थेस चालू तपासणी (०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२) या कालावधीसाठी ऑडीट वर्ग "अ" देण्यात येत आहे.

स्थळ - अहमदनगर
दिनांक - 22/08/२०२२

मे.गणेश कदम अँण्ड कं. करीता
सनदी लेखापरीक्षक
(सही)
सीए गणेश कदम
मान्यतापत्रिका क्र.- १०१४२१७
जिल्हा: अहमदनगर

२

# संभाजी छत्रपती

**• शुभेच्छा संदेश •**

अहमदनगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्या २२ व्या वार्षिक सभेच्या अहवाल पत्राच्या पृष्ठभागावर आपण छत्रपती चौथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे तैलचित्र प्रसिद्ध करून छत्रपती घराण्याचा जो सन्मान केला आहे त्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

आपल्या संस्थेचे कार्य मोठे आहे. आपणही समाजासाठी कार्यरत आहात समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना अर्थसाह्य देऊन आपण त्यांना पाठबळ देत आहात. याबद्दल आपले अभिनंदन !

हे कार्य असेच चालू राहो अशीच छत्रपती चरणी सदिच्छा आणि अहमदनगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्या भविष्यातील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

आपला

संभाजी छत्रपती

**(संभाजी छत्रपती)**

नवीन राजवाडा, कोल्हापूर - ४१६००३
**संपर्क** :- ०२३१ २६६९९४५ | ९६२३५३०८८९ | ९८५०५०८६७१ | ९९२२४१४१३०
E-Mail :- office@sambhajichhatrapati.com

# छत्रपती चौथे शिवाजी महाराज कोल्हापूर संस्थान (करवीर राज्य)

मी स्वतंत्र आहे मी ब्रिटिशांचा गुलाम नाही. मी प्रिन्स ऑफ वेल्सपेक्षा तीळभर कमी नाही! छत्रपती म्हणजे सार्वभौम राजे ! अशी सिंहगर्जना करीत इंग्रजाविरूद्ध एकाकी लढा देत अवघ्या वीस वर्षांच्या राजाने प्राणार्पण केले! त्या राजाचे नाव करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज.

अहमदनगरमध्ये दिल्लीगेटच्या पुढे आल्यावर अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या न्यू आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या समोर रस्त्याच्या पूर्व बाजूस छत्रपती शिवाजी महाराज (करवीर राज्य) यांचे सुंदर स्मारक आहे. त्यामध्ये पूर्णाकृती छत्रपतींचा पुतळा, समाधी स्थळ व वाचनालय आहे.

करवीर छत्रपती राजाराम (दुसरे) यांचे इ. स. १८७० मध्ये अकाली निधन झाले. त्यांना पुत्रसंतान नव्हते. त्यामुळे सावर्डेकर दिनकरराव भोसले यांचे पुत्र नारायण दिनकरराव भोसले नऊ वर्षाचे असताना करवीर गादीवर छत्रपती झाले. त्यांचे नाव शिवाजी असे ठेवले गेले त्यामुळे ते चौथे शिवाजी महाराज झाले. त्यांचा जन्म कोल्हापूर येथील सावर्डे येथे ५ एप्रिल १८६३ रोजी झाला. महाराजांचे व्यक्तिमत्त्व उंचेपुरे, रुबाबदार होते. २३ ऑक्टोबर १८७१ रोजी विजयादशमीच्या शुभमुहुर्ताला त्यांचा दत्तकविधी झाला. राज्याभिषेक करून चौथे शिवाजी महाराज कोल्हापूर राज्याचे छत्रपती झाले. महाराजांना घोडेस्वारी, शस्त्र-शास्त्र व राज्यकारभारात विशेष रुची होती. त्यांचे मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा आणि मोडी लिपीवर प्रभुत्व होते.

ब्रिटिशांकडून होणारे जुलूम छत्रपतींनी पाहिले होते. त्याबाबत महाराजांकडे माहिती येत होती. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज आहोत व त्यांच्या पुण्याईने हे राज्य मिळाले आहे. रयतेच्या कल्याणाची फार मोठी जबाबदारी आपल्यावर आहे, या भूमिकेतून ते सतत कार्यरत राहिले.

इ. स. १८७६ साली भारतात फार मोठा दुष्काळ पडला होता. चौथ्या शिवाजी महाराजांनी कोल्हापूर संस्थानात दुष्काळ निवारण यंत्रणा राबवली, दुष्काळावर मात केली. ठिकठिकाणी अन्नछत्रे घातली. छत्रपतींची ही कामगिरी पाहून जानेवारी १८७७ मध्ये ब्रिटिश साम्राज्याची महाराणी व्हिक्टोरिया यांनी छत्रपतींना नाईट कमांडर ऑफ दी स्टार ऑफ इंडिया' हा किताब दिला, पण पुढे काही दिवसांनी छत्रपतींनी हा सन्मान नाकारला.

पुढे इ. स. १८७८ साली श्रीमंत बाघोजीराव शिर्के यांची कन्या यमुनाबाई यांच्याशी महाराजांचा विवाह झाला. छत्रपतींनी आपल्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थानात खूप मोलाचे कार्य केले. रंकाळा तलाव निर्मिती कार्यास सुरुवात, पूल उभारणी, रस्ते, नवीन राजवाडा, शासकीय इमारती, कचेऱ्या, टाउन हॉल आदी वास्तूंची उभारणी याच काळात झाली. तेच आता कोल्हापूर शहराचे वैभव आहे.

महाराजांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. जानेवारी १८७८ मध्ये ब्रिटिशांनी स्टेट कारभारी म्हणून महादेव बर्वे यांची नेमणूक केली. महाराज अल्पवयीन असल्यामुळे राज्याचा सगळा कारभार दिवाण महादेव बर्वे पाहात होते. ते फार स्वार्थी, लाचार आणि धूर्त होते. त्यांनी इंग्रजांच्या मदतीने राज्य खालसा करण्यासाठी कटकारस्थानाला सुरूवात केली. महाराजांना वेड लागले आहे, अशी अफवा ते पसरवू लागले. महाराजांचा मानसिक छळ करून त्यांना मनोरुग्ण ठरवण्याचा हा कट होता. इंग्रजांच्या मदतीने त्यांनी कोल्हापूरमध्येच महाराजांना एकांतात बंदिस्त केले.

१९ जून १८८२ रोजी त्यांना गुप्तपणे पुणे मार्गाने अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्यात हलवले. किल्ल्यात एका इमारतीत एकांतात त्यांना ठेवण्यात आले. त्या भागात कोणालाही फिरकण्याची बंदी होती. पक्क्या बंदोबस्तात ठेवलेल्या कैद्यासारखी महाराजांची अवस्था केली होती. खासगी नोकराखेरीज फक्त इंग्रज प्रायव्हेट ग्रीन हाच दांडगा सैनिकगडी त्यांच्या सोबतीला ठेवला होता. या सर्वाचा अर्थ एवढाच होतो की, त्यांना सर्व परिचित व्यक्ती आणि वातावरण यापासून वेगळे काढून कैद्याप्रमाणे जीवन कंठावे लागत होते. त्यामुळे त्यांची मनःस्थिती अधिकच बिघडत गेली होती. त्यांच्या पत्नीलाही त्यांच्यापासून दूर ठेवण्यात आले होते. एकांतात ठेवल्यामुळे त्यांच्या प्रकृतीसंबंधीच्या अनेक बातम्या बाहेर पसरू लागल्या. प्रायव्हेट ग्रीन त्यांना बेदम झोडपून काढत असल्याचे समजू लागले. त्यांची छळवणूक अधिक होत असल्याच्या बातम्या बाहेर पसरू लागल्या. त्यामुळे लोकांचा संताप अधिकच वाढू लागला.

महाराजांचा मानसिक व शारीरिक छळ सुरूच होता. ग्रीन महाराजांचा मानसिक छळ करत होता. एके दिवशी महाराजांनी ग्रीनवर झडप टाकली आणि ग्रीनला उचलून आपटले. नरपशू आडदांड ग्रीनने महाराजांच्या पोटावर बुटाने जबरदस्त प्रहार केला. महाराज जमिनीवर कोसळले. महाराजांचा सेवक मल्हारीने धाव घेतली व महाराजांचे डोके आपल्या मांडीवर घेतले. महाराजांनी मल्हारीच्या मांडीवरच 'जगदंब जगदंब' म्हणत प्राण सोडले. तो दिवस होता २५ डिसेंबर १८८३. छत्रपती चौथ्या शिवाजी महाराजांचे अवघ्या विसाव्या वर्षी निधन झाले. छत्रपतींच्या मृत्यूनंतर नगर येथे त्यांच्या शवाची उत्तरीय तपासणी करण्यात आली. तेव्हा त्यांचा प्लिहा फुटून मृत्यू झाल्याचे दिसून आले.

त्यांच्यावर अहमदनगर येथे दिल्लीगेटपुढील परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले. मराठ्यांचा राजा आपल्या ताब्यात असताना मारला गेला हे समजले तर जनतेत मोठी खळबळ उडेल हे ब्रिटिशांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी महाराजांचे पार्थिव कोल्हापूरला नेण्याऐवजी नगरमध्येच अंत्यसंस्कार उरकून घेतले. अंत्यसंस्कारासाठी कोल्हापूरचे कोणीही उपस्थित नव्हते. महाराजांना अग्नी देण्याचे काम परशुराम उमाजी भोसले यांनी केले. ३० डिसेंबर १८८३ रोजी त्यांची रक्षा कोल्हापूरला पाठवण्यात आली. तेथे ती मिरवणुकीने पंचगंगा नदीत विसर्जन करण्यात आली.

चौथे शिवाजी महाराज यांचे कारकीर्द  सन १८७१ ते १८८३ अशी राहिली. महाराजांच्या कारकीर्दीत कोल्हापूर शहर व राज्यात काही नवीन लोकोपयोगी बांधकामे करण्यात आली. कोल्हापूर शहरातील टाउन हॉल छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल व पंचगंगा नदीवरील ऐतिहासिक 'शिवाजी पूल' हा याच छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या काळात बांधण्यात आला.

चौथ्या शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर पुढे राजर्षी शाहू महाराज करवीर संस्थानचे छत्रपती झाले. राजर्षी शाहू महाराजांनी अहमदनगरला येऊन समाधीचे दर्शन घेतले. त्यांची स्मृती चिरंतन राहावी म्हणून त्यांच्या नावाने वसतिगृह सुरू करण्याची त्यांची प्रबळ इच्छा होती. पुढे १९१४ साली श्री छत्रपती चौथे शिवाजी महाराज मराठा बोर्डिंग हाऊस, अहमदनगर या नावाने वसतिगृह सुरू झाले. त्यातूनच पुढे जानेवारी १९१८ साली अहमदनगर मराठा विद्या प्रसारक समाज या शैक्षणिक संस्थेची स्थापना झाली.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हुतात्मा करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

(संकलन : शिवश्री ज्ञानदेव पांडुळे )

## ठेवीचे व्याज दर (द.सा.द.शे.)

| | | | |
|---|---|---|---|
| सेव्हिंग्ज खाते - | ७% | | |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ७.५०% | ९१ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.५०% | १ वर्षाच्या पुढे | ९.००% |

## जिजाऊ लखपती ठेव योजना

दरमहा रू.१४००/- भरा ६० महिन्यानंतर

**रू.१ लाख मिळवा.**

## शंभुराजे चिरंजीव ठेव योजना

दरमहा रू.१०००/- भरा ७२ महिन्यानंतर

**रू.१ लाख मिळवा.**

## दामदुप्पट ठेव योजना

८४ महिन्यांनी ठेव रकमेच्या दुप्पट रक्कम

## ज्येष्ठ नागरिकांसाठी

१२ महिन्यांच्या मुदत ठेवीवर ९.५०%

मासिक व्याज सुविधा

## विविध कर्ज योजना

| | | | |
|---|---|---|---|
| वैयक्तिक कर्ज - | १५.००% | स्थावर तारण कर्ज - | १३.००% |
| व्यावसायिक कर्ज - | १३.००% | कॅश क्रेडिट कर्ज - | १३.००% |

**कमीत कमी व्याजदरात सोने तारण कर्ज सुविधा**








वाहन कर्ज

**१०%**

(नियम व अटी लागू)*